## क) आदिवासी क्षेत्रा बाहेरील आदिवासींना साखर कारखान्याचे शेअर्स खरेदीसाठी अर्थसहाय्य योजना :-

आदिवासी शेतक-यांना सहकारी साखर कारखान्याचे भागखरेदीसाठी अर्थसहाय्य योजना या योजने अंतर्गत आदिवासी क्षेत्राबाहेरील जे आदिवासी सभासद आहेत त्यांना साखर कारखान्याचे सभासद होणेसाठी ५० टक्के कर्ज व ५० टक्के अनुदान अशी योजना आहे. एकूण रुपये ०-०५ देण्याची योजना आहे.

## ड-विगर आदिवासी योजना अंतर्गतः-

## ड-१-डॉ.पंजाबराव देशमुख पिक उत्पादन प्रोत्साहन योजनाः-

जे शेतकरी सहकारी कृषि पत संस्थामार्फत रु.१५००० अथवा त्यापेक्षा कमी पीक कर्ज घेऊन त्यांची मुदतीत कर्जफेड करतील त्यांचेसाठी पीक उत्पादन प्रोत्साहन योजना क्र.सी.सी.आर-१४९१/सी.आर. ७१४/२ सी दि.२-११-९१ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या योजनेव्दारे शेतक-यांनी प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांकडून घेतलेल्या रु.१००००/- व त्यापेक्षा कमी कर्जावर उत्पादन प्रोत्साहन म्हणून ४ टक्के लाभाची रक्कम मंजुर करण्यात येत आहे.तद्नंतर दि.२४-५-९४ च्या शासननिर्णयान्वये सदर योजनेची व्याप्ती रु १०,०००/- वरून रु.१५,०००/-पर्यत वाढविणेत आली.दि.११-६-२००७ च्या शासननिर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेची व्याप्ती वाढविणेत आलेली आहे. या योजनेची ठळक वैशिष्ठ खालील प्रमाणे :-

१.या योजनेनुसार त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणेकडून रु.२५,०००/- पर्यंतचे पीक कर्ज घेणा-या आणि विहीत मुदतीत परतफेड करणारे शेतक-यांना ४ टक्के वार्षिकदराने व्याजाची सवलत चालु राहील.

२.या योजनेनुसार त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा यंत्रणेकडून रु.२५,०००/- पेक्षा जास्त पण रु. ३/- लाखापर्यतचे अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणा-या आणि विहीत मुदतीत परतफेड करणारे शेतक-यांना २ टक्के वार्षिकदराने व्याजाची सवलत चालु राहील.

३.उपरोक्त १ व २ मध्ये नमुद केल्यानुसार शेतक-यांनी घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची परतफेड प्रत्येक वर्षी दि.३० जुन पर्यत केल्यास ते या योजनेअंतर्गत सवलत घेण्यास पात्र असतील.

४.सुधारीत डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ सन २००६-२००७ या हंगामापासुन अल्प मुदत पीक कर्ज घेणा-या शेतक-यांना देण्यात येईल.

अशा प्रकारे उपरोक्त योजनेचे अधिक स्पष्टिकरण देण्याचे दष्टीने रु.३/- लाखापर्यत कर्जघेणा-या शेतक-यांना रु.२५०००/- पर्यत ४ टक्के व्याजसवलत व त्या पुढील कर्जा करीता २ टक्के व्याजाची सवलत लागु करण्यात आली आहे.

## ड-२-गटपातळीवरील ग्रामीण कारागिरांच्या सहकारी संस्थांना भागभांडवलः-

गटपातळीवरील ग्रामीण कारागिरांच्या सहकारी संस्थांना भागभांडवल १:२ प्रमाणात गटपातळीवरील ग्रामीण कारागिरांच्या सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल देण्याची योजना आहे.